मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# म्हाडाची पुणे, पिंपरीत एकूण 3 हजार घरे

## म्हाडाची 6 हजार 168 घरांची सोडत; 31 ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत




**पिंपरी | प्रतिनीधी**

गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने पुणे, पिंपरीसह सांगली व सोलापूर जिल्ह्यांत ६ हजार १६८ घरांची सोडत काढली आहे. यात पुणे व पिंपरी महापालिकेच्या हद्दीत प्रत्येकी सुमारे दीड हजार घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तर पीएमआरडीए क्षेत्रात अकराशेहून अधिक घरे असतील, अशी माहिती पुणे म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दिली. अर्ज व अनामत रक्कम स्वीकृती गुरुवारपासून (दि. ११) सुरू झाली असून अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर असेल. कृत अर्जांची अंतिम यादी १७ नोव्हेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार असून २१ नोव्हेंबरला सोडत जाहीर करण्यात येणार आहे. दरम्यान, गेल्यावर्षी ऑगस्टमध्ये काढण्यात आलेल्या सोडतीतील १ हजार ३०० शिल्लक राहिलेली घरेही या सोडतीत समाविष्ट करण्यात आली आहेत.

म्हाडाच्यावतीने आयोजित पत्रकार परिषदेत आढळराव यांनी ही माहिती दिली. यावेळी मुख्याधिकारी राहुल साकोरे, कार्यकारी अभियंता मनीषा मोरे, प्रकाश वाबळे, मिळकत व्यवस्थापक अतुल खोडे उपस्थित होते. म्हाडाच्या या सोडतीत एकूण ६ हजार १६८ घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यात म्हाडाच्या गृहनिर्माण योजनेतील प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य या तत्त्वावरील १ हजार ६८३ घरांचा समावेश आहे. तर म्हाडाच्या पंतप्रधान आवास योजनेतून २९९ घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तर १५ सामाजिक गृहनिर्माण व २० टक्के सर्व समावेशक गृहनिर्माण योजनेतून पुणे महापालिका हद्दीतील १ हजार ५३८, पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील १ हजार ५३४ तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील १ हजार ११४ घरे या सोडतीत नागरिकांसाठी ठेवण्यात आली आहेत.

अर्ज व अनामत रक्कम स्वीकृती गुरुवारपासून (दि. ११) सुरू झाली असून अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर असेल. स्वीकृत अर्जांची प्रारूप यादी ११ नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात येणार असून हरकती व दावे दाखल करण्याची अंतिम मुदत १३ नोव्हेंबर असेल. तर स्वीकृत अर्जांची अंतिम यादी १७ नोव्हेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार असून २१ नोव्हेंबरला सोडत जाहीर करण्यात येणार आहे. अर्ज करताना अधिवास प्रमाणपत्र २०१८ नंतर काढलेले आणि बारकोड असलेले बंधनकारक आहे. तर आधार आणि पॅन कार्ड डिजिलॉकर ॲपवरूनच स्वीकारले जाणार आहेत.

आढळराव म्हणाले, 'गेल्या वर्षभरात पुणे म्हाडाची ही दुसरी सोडत आहे. अर्ज करताना उत्पन्नाचा दाखला आधीच्या वर्षाचा घेतला जातो. मात्र, कोकण म्हाडा विभागात दोन वर्षांचा उत्पन्नाचा दाखला घेतला जातो. पुणे म्हाडातही तसा घेतला जाईल का, याबाबत पाठपुरावा करू. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शहरातील म्हाडाच्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यात या इमारतीचा पुनर्विकास समूह पद्धतीने शक्य नसल्यास एकल पद्धतीने करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी लवकरच करण्यात येणार आहे. येरवड्यातील वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासोबत चर्चा झाली असून संरक्षण विभागाच्या परवानगी मिळविण्याबाबत प्रयत्न सुरू आहेत. याबाबत आणखी एका बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे.'

या सोडतीत गेल्या सोडतीतील शिल्लक राहिलेल्या १ हजार ३०० घरांचा समावेश आहे. त्यात पुणे महापालिका हद्दीतील ५३१ घरांचा समावेश आहे. पीएमआरडीएतील २५० तर पिंपरी महापालिका हद्दीतील ४२३ घरांचा समावेश असल्याची माहिती साकोरे यांनी यावेळी दिली. दोन सोडतीत न विकली गेलेली घरे तिसऱ्या सोडतीत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर दिली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

---

# चिंचवडच्या श्री अग्रसेन ट्रस्टची नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर

## समाजहिताला अधिक प्राधान्य देण्यासाठी वचनबद्ध राहण्याचा पदाधिकाऱ्यांचा संकल्प

**पिंपरी | प्रतिनीधी**

समाजसेवा आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सातत्याने आघाडी घेणाऱ्या श्री अग्रसेन ट्रस्ट, चिंचवडची नवनिर्वाचित कार्यकारिणी (कार्यकाळ २०२५-२०२८) नुकतीच जाहीर झाली.

निवड प्रक्रिया पंच सदस्य कृष्णकुमार गोयल, रामअवतार अग्रवाल, वेदप्रकाश गुप्ता आणि डॉ. रमेश शिवनारायण बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

**असे आहेत नवीन पदाधिकारी...**

अध्यक्ष - मोहन जे. गर्ग

कार्याध्यक्ष - विकास तरसेम गर्ग

उपाध्यक्ष - अशोक आर. अग्रवाल

सचिव - आशीष पी. गर्ग

सहसचिव पवन अग्रवाल

कोषाध्यक्ष - धर्मेंद्र जे. अग्रवाल

सहकोषाध्यक्ष - दिनेश अग्रवाल

भवन निर्माण समिती, अध्यक्ष - लाजपतराय मित्तल, उपाध्यक्ष नरेश एच. गुप्ता




**परंपरा आणि अपेक्षा...**

» श्री अग्रसेन ट्रस्टने सदैव समाजात ऐक्य, सहयोग आणि सेवाभाव जपण्याचा वारसा पुढे नेला आहे. नव्या कार्यकारिणीमुळे समाजजीवनात सकारात्मक बदल आणि नवीन उर्जा निर्माण होईल, असा विश्वास समाजजनांनी व्यक्त केला आहे.

भवन व्यवस्थापक - महावीर एम. बंसल

वैद्यकीय समिती - जगमोहन अग्रवाल, प्रवीण अग्रवाल

सांस्कृतिक समिती अध्यक्ष - विकास गर्ग, उपाध्यक्ष, राजेश अग्रवाल, दिनेश अग्रवाल, आशिष गर्ग.

मुख्य मार्गदर्शक - रमेश अग्रवाल

कार्यकारिणी सदस्य - विनोद मित्तल.

# प्रारूप प्रभाग रचनेवरील सूचना व हरकतींची सुनावणी पूर्ण

## पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक : शहरातील 32 प्रभागांसाठी सुनावणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सूचनांची सुनावणी आज चिंचवड येथील ॲटो क्लस्टर सभागृहात पार पडली. सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव तथा प्राधिकृत अधिकारी प्रविण दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सुनावणी प्रक्रिया पार पडली.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सुनावणी प्रक्रियेचे कामकाज पार पाडले. यावेळी सहशहर अभियंता मनोज सेठीया, बापु गायकवाड, अनिल भालसाकळे, सहाय्यक नगररचना संचालक प्रशांत शिंपी, उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, सहाय्यक आयुक्त मुकेश कोळप, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.




पिंपरी चिंचवड महापालिकेने २२ ऑगस्ट २०२५ रोजी ३२ प्रभागांची प्रारूप रचना जाहीर केली होती. प्रारूप प्रभाग रचनेचे नकाशे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले होते. तसेच महापालिका भवनामध्येही हे नकाशे माहितीसाठी प्रदर्शित करण्यात आले होते. प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना देण्यासाठी गुरुवार ४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर आज प्रभागनिहाय टप्प्याटप्प्याने सुनावणी घेण्यात आली.

या सुनावणीदरम्यान हरकतदारांनी त्यांच्या हरकतीच्या अनुषंगाने अतिरिक्त स्वरूपात म्हणणे सादर केले .हरकतदाराची हरकत, त्यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेले म्हणणे, शासनाचे निर्देश आणि त्या अनुषंगाने समोर येणारी वस्तुस्थिती लक्षात घेऊन प्रत्येक हरकत निर्णित करण्यात येणार आहे. तदनंतर अंतिम प्रभाग रचना शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

### अशी पार पडली प्रभागनिहाय सुनावणी

» प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकतींच्या सुनावणीसाठी हरकतदारांना पूर्वसूचना देऊन उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने प्रभागनिहाय व हरकतीच्या क्रमांकानुसार हरकतदारांना वेळ कळवण्यात आली होती. या सुनावणीचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले होते. या वेळापत्रकानुसार दुपारी १ वाजता प्रभाग क्रमांक १, २, ११ आणि १२ वर आलेल्या हरकतींची, दुपारी २ वाजता प्रभाग क्रमांक ३, ४, ६, ७, ८, ९, १०, १४ आणि २० वर आलेल्या हरकतींची, दुपारी ३ वाजता प्रभाग क्रमांक १० आणि ११ वर आलेल्या हरकतींची आणि सायंकाळी ४ वाजता प्रभाग क्रमांक २३, २४, २५, २६, २९, ३१ आणि ३२ वर आलेल्या हरकतींची सुनावणी सुरू करण्यात आली.

# वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी चाकणमधील अतिक्रमणावर ठोस कारवाई

## पीएमआरडीएसह नगरपरिषद, एनएचएआयकडून संयुक्त कारवाईला प्रारंभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

चाकण एमआयडीसीसह परिसरातील नागरी समस्या आणि वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. बुधवारपासून (दि. १०) नगरपरिषद, एनएचएआयकडून पोलीस बंदोबस्तात या भागातील ४० अतिक्रमणावर कारवाई करण्यात आली असून यापुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे यावेळी प्रशासकीय यंत्रणेने स्पष्ट केले.

गेल्या आठवड्यात पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी चाकण एमआयडीसीसह शहर परिसरातील अनाधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणावर कारवाईच्या अनुषंगाने संबंधित प्रशासकीय यंत्रणेची बैठक घेऊन याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार संबंधित कारवाई पुणे-नाशिक महामार्गावर चाकण- तळेगाव चौक, आंबेठाण चौक ते एकतानगर रस्त्याच्या एका बाजूने करण्यात आली असून सुमारे ४० अतिक्रमणे काढण्यात आली. या रस्त्यावरील अतिक्रमणधारकांनी स्वतःहून आपल्या अतिक्रमणे काढून घ्यावी, अशा आशयाच्या नोटीसा पूर्वीच बजावण्यात आल्या होत्या. मात्र याकडे संबंधितांनी दुर्लक्ष केल्यामुळे बुधवारपासून अतिक्रमण निर्मूलनाची मोहीम राबवण्यात येत आहे.

या कारवाईमुळे संबंधित भागातील रहदारी सुरळीत होण्यास मदत होणार असून पुणे- नाशिक महामार्गावर दोन्ही बाजूने प्रत्येकी साडेबावीस मीटरच्या आतील अतिक्रमणे काढण्यात येत आहे. यावेळी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे




सह कार्यकारी अभियंता दिलीप शिंदे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे रवींद्र रांजणे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय सोळंके, वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी आणि अतिक्रमण निर्मूलन विभागाचे पथकातील कर्मचारी उपस्थित होते.

# पूरपरिस्थिती रोखण्यासाठी 369 कोटींच्या आराखड्याला मंजुरी

## प्रस्ताव 26 जून 2025 रोजी नगरविकास विभागाकडे मान्यतेच्या प्रक्रियेत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावरील एकतानगर, विठ्ठलनगर व निंबजनगर या मुठा नदीलगतच्या भागातील पूरपरिस्थिती रोखण्यासाठी याठिकाणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्यासाठी महापालिकेने आराखडा तयार केला आहे. त्यासाठी सुमारे 369 कोटींचा खर्च अपेक्षित असून या खर्चाला महापालिकेस पूर्वगणक समितीच्या बैठकीत मंगळवारी मंजुरी दिली आहे.




गतवर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे खडकवासला धरण साखळीतून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सोडल्याने सिंहगड रस्त्यावरील मुठा नदीलगतच्या एकतानगर, विठ्ठलनगर आणि निंबजनगर या सखल भागांमध्ये पाणी शिरून जनजीवन विस्कळीत झाले होते. अनेक इमारती व वस्त्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री यांनी घटनास्थळाचा पाहणी दौरा केला होता. तसेच, पूरस्थिती रोखण्यासाठी शासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर यंदाही या भागात काही सोसायट्यांमध्ये पूराचे पाणी घुसले होते. त्यामुळे ही पूरस्थिती रोखण्यासाठी तसेच नदीकाठ विकसन प्रकल्प राबविण्यासाठी महापालिकेकडून सुरुवातीला 300 कोटींचा खर्च अपेक्षित असल्याने शासनाकडे आपत्ती व्यवस्थापन निधीतून 300 कोटींची तरतूद करण्याची मागणी केली आहे. हा प्रस्ताव 26 जून 2025 रोजी नगरविकास विभागाकडे मान्यतेच्या प्रक्रियेत आहे.

### ...असा असेल नदी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प

» वडगाव खुर्द ते राजाराम पूल या 4.10 कि.मी. लांबीच्या स्ट्रेच-6 मध्ये मुठा नदीपात्राच्या दोन्ही बाजुंनी ही कामे करण्यात येणार आहेत. या कामांत दोन्ही काठांवर 'एम्बँकमेंट' करून पूरवहन क्षमता वाढविणे, नागरिकांसाठी पथदिवे, घाट तसेच सुशोभीकरणाची कामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे नदीकाठी असलेल्या वस्त्यांना पुरापासून संरक्षण मिळेल, असा महापालिकेचा दावा आहे. या प्रकल्पासाठी सुरुवातीला 300 कोटींचा अंदाज बांधण्यात आला होता. मात्र, तपशीलवार पूर्वगणनपत्रकानुसार या कामांचा खर्च जीएसटीसह अन्य कर वगळता 369 कोटींवर गेला आहे.

# सायबर गुन्हेशोधासाठी 5 हजार पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येणार

## राज्यमंत्री योगेश कदम यांची माहिती; अन्न औषध विभागात 400 निरीक्षकांची भरती

**पुणे | प्रतिनिधी**

सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन या गुन्ह्यांच्या शोधासाठी ५ हजार पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्यानंतर अशा प्रकारच्या गुन्ह्यांच्या तपासात लक्षणीय यश मिळेल असा विश्वास गृहराज्य व अन्न औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी व्यक्त केला. अन्न व औषध प्रशासन विभागात ४०० निरीक्षकांची भरती केली असल्याचे त्यांनी सांगितले.

श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार भवनच्या कमिन्स सभागृहात गुरूवारी दुपारी कदम यांचा वार्तालाप झाला. प्रास्तविकात कदम यांनी त्यांच्याकडे असणाऱ्या खात्यांमध्ये करण्यात येत असलेल्या सुधारणांबाबत माहिती दिली. राज्यमंत्री म्हणून मिळालेल्या अधिकारांमध्ये काम करण्याचा प्रयत्न आहे. मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांचे आवश्यक ते सर्व सहकार्य मिळते असे त्यांनी स्पष्ट केले.

सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या संख्येबद्दल विचारले असता कदम म्हणाले, " गुन्ह्यांच्या या प्रकारात तंत्रज्ञान जास्त आहे. त्यामुळेच आता या प्रकारच्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी ५ हजार पोलिसांना प्रशिक्षित करण्यात येत आहे. त्यात हवालदारापासून ते वरिष्ठ पोलिस अधिकारी यांचा समावेश आहे. त्याशिवाय मुंबईत एक संयुक्त केंद्रही तयार करण्यात येत आहे. फिर्याद दाखल झाली की मिनिटभरातच ती या केंद्रापर्यंत पोहचेल व त्यानंतर लगेचच तपासाची सुत्रेही हलतील. या केंद्रांचा देशात, देशाबाहेर अशा प्रकारच्या गुन्ह्यांचा तपास करणाऱ्या सर्व केंद्रांबरोबर संपर्क असेल."



सरकारमधील राज्यमंत्री त्यांच्या खात्याच्या कॅबिनेट मंत्र्यांकडून सहकार्य मिळत नसल्यामुळे नाराज आहेत, त्यातही शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्या मंत्र्यांना लक्ष्य केले असल्यासारख्या घटना घडत आहेत याकडे लक्ष वेधले असता कदम म्हणाले, "प्रत्येकच राज्यमंत्र्यांला सुरूवातीच्या काळात संघर्ष करावाच लागतो. काही दिवसांनी दोघांचेही व्यवस्थित जमते. तसाच प्रकार आहे. काही ठिकाणी संघर्ष होतो मात्र ते स्वाभाविक आहे. नेत्यांमध्ये चांगला समन्वय आहे. त्यामुळे संघर्ष झाला तरी तो फार टिकत नाही."

अन्न औषध प्रशासन विभागाकडे मनुष्यबळ नव्हते हे सत्य आहे. नागरिकांना जागृत करण्यासाठी म्हणून ज्या प्रसार व प्रचार मोहिमा कराव्या लागतात, त्यासाठी त्यांच्याकडे साधे बजेटही नव्हते. आता स्थिती बदलली आहे. ३९४ निरीक्षकांची या खात्यात भरती केली. त्यांचे प्रशिक्षणही झाले आहे. या विभागाला बजेट मिळवून देण्यातही यश आले. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये या खात्याचे काम दिसू लागले असे कदम यांनी सांगितले. गुटखा विक्री सर्रासपणे सुरू आहे हेही त्यांनी मान्य केले व त्याविरोधात मोहिम सुरू करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती दिली. संघाचे अध्यक्ष ब्रीजमोहन पाटील यांनी स्वागत केले. सरचिटणीस मंगेश फल्ले यांनी प्रास्तविक केले. उपाध्यक्ष सागर आव्हाड यांनी आभार व्यक्त केले.

ज्या बारचे प्रकरण विधानसभेत उपस्थित करण्यात आले तो बार आपण चालवत नव्हतो. तो काही माझा व्यवसाय नाही. जागा आमची होती, ती भाडेतत्वावर दिली होती व आम्ही भाडे स्विकारत होतो असे समर्थन कदम यांनी केले. सरकारमधील मंत्री सातत्याने वादग्रस्त होत आहेत हे खरे आहे, मात्र ती त्यात्या वेळची स्थिती असते, विरोधक त्याचे भांडवल करतात असे ते म्हणाले.

# देहविक्री करणाऱ्या महिला रस्त्यावरच उभ्या!

## चिखली, मोशी परिसरात नागरिक वेश्याव्यवसायामुळे त्रस्त; सोसायटी फेडरेशनचे पोलिसांना पत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली, मोशी परिसरामध्ये काही ठिकाणी देहविक्री (वेश्या व्यवसाय) करणाऱ्या काही महिला राजरोस रस्त्यावरच उभ्या राहून अनैतिक गोष्टी करीत आहेत, त्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे, त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई करावी, यासाठी चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनने पोलिसांना पत्र दिले आहे.



चिखली, मोशीमधील मोशी-आळंदी रोडवरील अक्षा एम्पायर सोसायटीसमोर असणाऱ्या पेट्रोल पंपाजवळ, तसेच रिव्हर रेसिडेन्सीच्या ते कोलसिस ग्रीन सोसायटीच्या रस्त्यावर व या आजूबाजूला मोकळ्या जागेमध्ये रात्रीच्या वेळी काही महिला देहविक्रीसाठी उभ्या राहतात. याबाबत सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले की, पोलिस प्रशासनाकडून याकडे डोळेझाक केली जाते. या भागामध्ये राहणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास होत आहे. या भागातील संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना कडक सूचना द्याव्यात, याबाबत मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही पत्र दिले आहे.

> “ चिखली-मोशी परिसरातील मोशी-देहू रस्त्यावरील चौकामध्ये सायंकाळपासून रात्री बारापर्यंत अनेक महिला उभ्या राहून देहविक्रीचा व्यवसाय करतात. या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात सोसायट्या आहेत. नागरी वस्ती असताना राजरोजपणे असे धंदे सुरू आहेत. संवेदनशील विषय असल्यामुळे पोलिस प्रशासनाने यावर त्वरित कडक कारवाई करावी.
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**

# मोशीतील शिवाजीवाडी रस्ता अतिक्रमणमुक्त

## हातगाड्या, पथारी, चायनीज सेंटर व टपऱ्या हटवल्या; रस्ता मोकळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-नाशिक महामार्गालगत मोशीतील शिवाजीवाडी रस्त्यावर होत असलेल्या अतिक्रमणांवर बुधवारी (१० सप्टेंबर) महापालिकेने धडक कारवाई केली. पादचारी मार्गावर उभारलेले स्टॉल्स, हातगाड्या, टपऱ्या आणि छोटे व्यवसायिकांनी ठेवलेले साहित्य हटवून रस्ता मोकळा करण्यात आला.

गेल्या काही दिवसांपासून वाहतूक कोंडी व पादचारी त्रासाबाबत वारंवार तक्रारी येत होत्या. यानंतर ‘ई’ प्रभागाच्या टीमने अतिक्रमणविरोधी मोहीम राबवली. या कारवाईत पाच हातगाड्या, तीन पथारी, चायनीज सेंटर, चहाची टपरी, पानपट्टीसह एकूण १८ अतिक्रमणे हटवण्यात आली.




“महापालिकेच्या सारथी ॲपवर नागरिकांकडून शिवाजीवाडी रस्त्यावरील अतिक्रमणांविरोधात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार कारवाई करून रस्ता मोकळा केला आहे. पुढेही ही मोहीम नियमित सुरू राहील,” असे क्षेत्रीय अधिकारी तानाजी नराळे यांनी सांगितले.

या कारवाईत अतिक्रमण निरीक्षक प्रवीण लांडे, स्थापत्य अभियंता सहायक, १९ एमएसएफ जवान, दोन पोलिस कर्मचारी आणि महापालिकेचे १२ अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते. सध्या रस्ता मोकळा असला तरी पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी नियमित पाहणी केली जाणार असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.